# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** जयसिंगपूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0122 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/04/2023 21:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 20/04/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/04/2023
**Time From (वेळेपासून):** 10:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/04/2023 **Time (वेळ):** 21:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/04/2023 21:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जयसिंगपूर पोलीस ठाणे व, जयसिंगपुर पोलीस ठाणेची जुनी ई, ईमारत जयसिंगपुर , ता शिरोळ,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.प्रशांतकुमार महावीर पाटील
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** महावीर पाटील
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | समगे गल्ली,कोथळी,शिरोळ,जयसिंगपूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | समगे गल्ली,कोथळी,शिरोळ,जयसिंगपूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** व्यावसायीक
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9011116001

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ देवराम चळचुक सफौ | | वडील का नाम : देवराम चळचुक | 1. श्री महादेव कोळी यांचे घरी , भाडयाने,गल्ली नं16,विजयमाला ,जयसिंगपूर, ,शिरोळ, जयसिंगपूर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या 20भारतीय | 10,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 20/04/2023

मी प्रशांतकुमार महावीर पाटील, वय -41 वर्षे, व्यवसाय - खादयपदार्थ निर्मिती व्यापार, रा. समगे गल्ली, कोथळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर मो.नं. 9011116001 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक19/04/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून त्यांना माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, मी महिन्द्रा कंपनीचा फायनान्स घेवून चारचाकी मारुती ओमनी व्हॅन मे 2012 मध्ये घेतली होती. सदर व्हॅन मी माझा मित्र नितीन पायगोंडा पाटील यास महिन्द्रा कंपनीच्या फायनान्स कर्जासह दि.10/11/2012 रोजी विकली होती.माझे मित्र नितीन पाटील यांनी सदर गाडी आपले नावावर करून घेतली नाही. तसेच सदर व्हॅनवर असलेले फायनान्सचे हसे देखील न भरता सदरची व्हॅन परस्पर व्यवहार करून कोनाला तरी विकली म्हणून मी त्याचेविरूध्द कारवाई होवून माझी गाडी परत मिळावी म्हणून जयसिंगपूर पोलीस स्टेशन येथे दि.19/04/2023 रोजी तक्रारी अर्ज दिला असुन सदर अर्जाप्रमाणे कारवाई करून मला माझी ओमनी कार परत मिळवुन देणेकरीता जयसिंगपूर पोलीस ठाणे येथील पोलीस चळचुक साहेब यांनी 15,000/- रूपये द्यावे लागतील अशी मागणी केली आहे तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 20/04/2023 रोजी चळचुक साहेब यांना जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे भेटण्यास जाणार असलेचे सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी ते स्वतः त्यांचे स्टाफ व पंचासह दिनांक 20/04/2023 रोजी जयसिंगपूर येथे येत असल्याचे त्यांनी सांगीतले.

दिनांक 20/04/2023 रोजी मी व नाळे साहेब एकमेकांचे संपर्कात होतो. त्यांना मी चिपरी हददीमध्ये चौंडेश्वरी फाटयाजवळ असलेल्या मंगोबा देवालय मंदिराजवळ येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी येण्यापुर्वी नाळे साहेब व त्यांचा स्टाफ, पंच असे मंगोबा मंदिराजवळ आले होते. त्यावेळी मी त्यांना भेटुन माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी नाळे साहेबांनी माझी शासकीय दोन्ही पंच, त्यांचा स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगीतली.

त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले. साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन जयसिंगपूर पोलीस ठाण्यातील पोलीस सोमनाथ चळचुक यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 यांना माझेकडील मोटर सायकल एम.एच. 09.जीडी.9578 वरून जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे पाठवुन देवुन मी व पंच जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे आलो. तेथे मी आत चळचुक साहेबांकडे गेलो त्यावेळी त्यांचेसमोर लोक होते त्यांनी मला पोलीस ठाणेचे बाहेर दहा पंधरा मिनीट थांबणेस सांगीतले. त्यानंतर मी थोडयावेळाने पुन्हा आत गेलो त्यावेळी आमच्यात मी दिलेल्या अर्जाबाबत बोलणे झाले.त्यानंतर ते पोलीस ठाणेतुन बोलत बोलत माझे सोबत बाहेर आले. त्यावेळी चळचुक साहेब यांनी मला माझे अर्जावर कारवाई करणेसाठी तसेच माझी कार मला नितीन पाटील यांचेकडुन परत देणेकरीता आणखीन पाच ते दहा द्यावे लागतील असे म्हणुन पंधरा पर्यंत जाते पण दहा दे असे म्हणुन 10,000/- रूपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला नाही नाही दहा द्यावे लागतील असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना काहीतरी जुळणीकरून घेवुन येतो असे म्हणुन मी व पंच असे नाळे साहेब थांबलेले ठिकाणी परत आलो. तेथे त्यांनी मला व पंच नं.1 पाटील यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन खात्री केली.

त्यानंतर पोलीस सोमनाथ चळचुक यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 10,000/- रूपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे डावे खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने नाळे साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 असे माझे मोटर सायकलने जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे गेलो त्याचवेळी आमचे पाठोपाठ नाळे साहेब, पंच नं.2 श्रीकांत भोसले व सापळा पथक असे गाडीमधुन आले. त्यावेळी नाळे साहेब व त्यांचे पथकाने जयसिंगपूर पोलीस ठाणेचे जवळ येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी चळचुक साहेबांना फोन लावला त्यावेळी त्यांनी मला जुन्या पोलीस ठाणेस येणेस सांगीतले. मी जुन्या पोलीस ठाणेचे पत्र्याचे इमारतीमध्ये गेलो त्यावेळी चळचुक साहेब तेथे बसलेले होते. त्यावेळी त्याच्यांशी माझे अर्जाबददल बोलणे झाले. चळचुक साहेबांनी मला अर्जातील गैरअर्जदार नितीन पाटील व रूकडीचे लोक येवुन गेले असुन माझी गाडी मंगळवार पर्यंत देतो असे सांगीतले. त्यावेळी मी चळचुक साहेबांना तुम्ही सांगितलेप्रमाणे दहा हजार रूपयांची जुळणी करून आणले आहेत असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला ते पैसे त्याच्या बाजुलाच असलेल्या टेबलवरील असलेल्या को-या कागदाच्याखाली ठेव असे सागिंतले असता मी त्यांना पैसे मोजुन घ्या असे बोललो असता ते नको, ठेव कागदाच्याखाली पैसे असे बोलले आणि पैसे मोजण्याची गरज नाही विश्वास आहे तु पैसे ठेव असे म्हणाले. त्यानंतर मी चळचुक साहेब यांनी मागणी केलेले 10,000/- रूपये टेबलवरील कागदामध्ये ठेवले. त्यावेळी मी त्यांना कालचे पाच व आजचे दहा असे पंधरा हजार रूपये दिले तरी मला गाडी लवकरात लवकर घेवुन द्या असे म्हणालो. त्यावेळी चळचुक साहेबांनी मंगळवारी द्यायला सांगतो असे बोलले त्यांनतर मी सदर इमारतीचे खोलीतुन बाहेर येवुन माझे डोक्यावरील टोपी काढुन पैसे स्वीकारलेबाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच नाळे साहेब, पंच नं.2 भोसले व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन पोलीस सोमनाथ चळचुक यांना पकडले.

त्यानंतर नाळे साहेब यांनी माझे समक्ष पोलीस सोमनाथ चळचुक यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव सोमनाथ देवसम चळचुक, वय -48 वर्षे, सहायक पोलीस उपनिरीक्षक नेमणुक जयसिंगपूर पोलीस ठाणे जि.कोल्हापूर रा.श्री महादेव कोळी यांचे घरी भाडयाने 16 नं.गल्ली, विजयमाला नगर, जयसिंगपूर, मुळ रा. बाडगी, ता.पेट, जि.नाशिक असे असल्याचे सांगितले. चळचुक साहेबांना पकडले ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली.

तरी मी सन 2012 मध्ये ओमनी कार घेतली होती ती कार मी नितीन पाटील याला फायनान्स कर्जासह दि. 10/11/2012 रोजी विकली आहे. माझे मित्र नितीन पाटील यांनी सदर गाडी आपले नावावर करून घेतली नाही. तसेच व्हॅनवर असलेले फायनान्सचे हप्ते न भरता व्हॅन परस्पर व्यवहार करून त्रयस्थ व्यक्तीला विकली म्हणून मी त्याचेविरूध्द कारवाई होवून माझी गाडी परत मिळावी म्हणून जयसिंगपूर पोलीस स्टेशन येथे दि.19/04/2023 रोजी तक्रारी अर्ज दिला होता.सदर अर्जाप्रमाणे कारवाई करून माझी ओमनी कार मला परत मिळवुन देणेकरीता जयसिंगपूर पोलीस ठाणे येथील सहायक पोलीस उपनिरीक्षक चळचुक यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे तसेच स्वःताच्या फायदयाकरीता 15,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 10,000/- लाचेची मागणी करून ती स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी सोमनाथ देवराम चळचुक, वय - 48 वर्षे, सहायक पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक जयसिंगपूर पोलीस ठाणे जि. कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगीतलेप्रमाणे संगणकावर टंकलिखत केलेली असुन ती मी वाचुन पाहिली असता खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RANJIT HANAMANTRAO PATIL(SI (Sub-Inspector)) / 15101000402RHPM8501A **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / Informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Patil

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

WPSI

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अमलदार
जयसिंगपूर पोलीस ठाणे
जिल्हा कोल्हापूर

**Name** (नाव): RANJIT HANAMANTR

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): 15101000402RHPM850